| पुणे पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./३७३१/२०२४** **दिनांक :- २२/०५/२०२४**

## प्रसिद्धीपत्रक

**दिनांक- २३/०५/२०२४ रोजी बुद्ध पौर्णिमे निमित्त वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत**

बंडगार्डन वाहतूक विभागाचे अंतर्गत पुणे स्टेशन,डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे पुणे शहरातील विविध भागांमधुन डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास अभिवादन करणेकरीता मोठ्या संख्येने नागरीक येत असतात. सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीत राहणेकरीता सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. यास्तव महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, रोहिदास पवार, पोलीस उप आयुक्त, वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **आवश्यकतेनुसार** व तेथील वाहतुकीच्या परिस्थितीनुसार वाहतुक व्यवस्थेमध्ये **दिनांक २३/०५/२०२४ रोजी सकाळी ०५.०० वा.** पासून गर्दीसंपेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतूकीत खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

- **बोल्हाई चौकामधुन साधुवासवानी पुतळा चौकाकडे जाण्यासाठी प्रवेश बंद राहील**

पर्यायी मार्ग **:-** १. बोल्हाई चौकातुन पुणे स्टेशन, अलंकार चौक मार्गे साधुवासवानी पुतळा चौक.

**किंवा**

२. बोल्हाई चौकामधुन सरळ बॅनर्जी चौक सरळ नेहरु मेमोरीयल हॉलचौक येथुन डावीकडे वळण घेवून साधुवासवानी पुतळा चौक.

( **रोहिदास पवार** )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**